|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# North Maharashtra University, Jalgaon

## उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

A' Grade

'(NAAC Re-Accredited )

3rd Cycle

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९,२५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

जळगाव दि. 15 ( प्रतिनिधी ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभेवर नोंदणीकृत पदवीधरांमधून निवडून द्यावयाच्या दहा जागांसाठी २१ जानेवारी रोजी निवडणूक होत असून या निवडणूकीसाठी आज सोमवार दि.15 जानेवारी रोजी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण झाले.

विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात झालेल्या या प्रशिक्षण वर्गात कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी भ.भा.पाटील यांनी मार्गदर्शन केले. 26 मतदान केंद्रात 68 बुथवर मतदान होत असून यासाठी प्रत्येक बुथवर सहा कर्मचाऱ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. 9 विभागीय अधिकारी देखील नियुक्त करण्यात आले असल्याची माहिती भ.भा.पाटील यांनी दिली. नि:पक्षपातीपणे व पारदर्शी पध्दतीने या निवडणूका होतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

23,737 मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदारांच्या अनुक्रमांकाप्रमाणे मतदान केंद्रातील मतदान कक्षाच्या स्थळाची माहिती विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर देण्यात आली आहे, अशी माहिती श्री.पाटील यांनी दिली. यावेळी उपस्थितांच्या शंकाचे निरसन करण्यात आले. प्रारंभी निवडणूक विभाप्रमुख आर.बी.उगले यांनी प्रास्ताविक केले. या प्रशिक्षणासाठी विद्यापीठातील अधिकारी-कर्मचारी तसेच ज्या महाविद्यालयात मतदान केंद्र आहेत त्या महाविद्यालयांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

---

जा.क्र. : उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दिनांक : १५ जानेवारी, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-

(सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी